RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक २३] शुक्रवार, एप्रिल २४, २०१५/वैशाख ४, शके १९३७ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ४७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त)

आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०१५.

संदर्भ : राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक रानिआ/मनपा. २०१५/प्र.क्र. ०५/का. ५, दिनांक २७ मार्च २०१५ चे आदेश.

आदेश

क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१५/प्र.क्र. २०/का. ७.—राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भांकित दिनांक २७ मार्च २०१५ च्या आदेशान्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १ एप्रिल २०१५ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या अधिनियमांतर्गत असलेल्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या जून २०१५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात आले आहे.

त्यमध्ये अंशत: बदल करुन जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या जून २०१५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादीऐवजी दिनांक ३० एप्रिल २०१५ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदान यादी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

नि. ज. वागळे,

अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.